# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा घटक)

**KONKAN HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD**

**(A MHADA UNIT)**

म्हाडा MHADA


जा.क्र. : उमुअ /कों.मं./5866 /२०१८

दिनांक : 04/08/18

## "शुध्दीपत्रक"

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत सन २०१८ मधील विविध उत्पन्न गटातील विविध ठिकाणी बांधण्यात आलेल्या व विक्रिसाठी उपलब्ध असलेल्या एकुण ९०१८ सदनिका विक्रिची जाहिरात दि.१७ जुलै २०१८ रोजी वर्तमान पत्रात प्रसिदध करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अर्जदारांकरीता म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती पुस्तिका उपलब्ध करण्यात आलेली आहे.

उपरोक्त जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या प्रत्येक योजनेकरीता लागू असलेल्या आरक्षणानूसार उपलब्ध सदनिकांची संख्या माहितीपुस्तिकेत नमुद करणे आवश्यक होते. तथापी माहितीपुस्तिकेमधील पृष्ठ क्र.२८ वरील स्तंभ क्र.१८ च्या तक्त्यामध्ये संकेत क्र.२६३-अ (०२) प्रवर्गामध्ये अनावधानाने स्वातंत्र्य सैनिक, महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदचे, विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माजी सदस्य यांचेकरीता सदनिका दर्शविण्यात आलेल्या आहेत. तरी सदर संकेत क्रमांकमध्ये जाहिरातीत दर्शविल्यानुसार सर्वसाधारण जनता प्रवर्ग वगळता इतर कोणत्याही प्रवर्गाकरीता सदनिका उपलब्ध नाही, सदर बाबही जाहिरातीमध्ये स्पष्टपणे नमूद आहे. तसेच ऑनलाईन अर्ज सादर करतानाही सदरच्या सदनिका सर्वसाधारण जनता प्रवर्गामध्येच नमुद आहेत यांची नोंद घ्यावी.

उपमुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ


गृहनिर्माण भवन, पोटमाळा, वान्द्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी: ०२२-२६५९ १५०२ • फॅक्स: ०२२-२६५९ १५०२

Griha Nirman Bhavan, Mezzanine Floor, Bandra (E),
Mumbai-400 051. Tel. : 022-2659 1502 • Fax: 022-2659 1502
Email: konkanmhada2008@gmail.com